5/23, 10:27 PM WhatsApp Image 2023-04-05 at 10.53.54 PM (4).jpeg

VOL. 4 | ISSUE 2 | FEB. 2018
(UGC Approved Journal No. 63716)

ISSN: 2454-5503
IMPACT FACTOR : 4.197 (IIJIF)

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES


A BIMONTHLY REFEREED INTERNATIONAL JOURNAL

SPECIAL ISSUE
On the Occasion of One Day International Conference On

## RECENT ADVANCES IN LANGUAGES, LITERATURE AND SOCIAL SCIENCES

17[th] February, 2018

(BOOK- 2)



*Guest Editors*

**Prof. Vinod Khedkar**
**Dr. Atmaram Tekale**

ORGANIZED BY
MGEWS
CENTRE FOR HUMANITIES AND CULTURAL STUDIES,
KALYAN, DIST. THANE &
NEW MAN INTERNATIONAL JOURNAL OF
MULTI-DISCIPLINARY STUDIES, PARBHANI

www.newmanpublication.com

Govt. College of Arts & Science, Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

/23, 10:28 PM



## अनुक्रमणिका....


| | | |
|---|---|---|
| 1. डॉ. प्रभा अत्रे यांचे सांगितिक साहित्य : उद्देश आणि निर्मिती | शिवाली पांडे | 05 |
| 2. महात्मा जोतीबा फुले आणि स्त्री सबलीकरण | प्रा.राऊतखेडकर महानंदा श्रीराम | |
| | प्रा.डॉ.स्वाती व्ही.पाटील | 07 |
| 3. सॉक्रेटिसचे राजकीय तत्त्वज्ञान आणि लोकशाही | डॉ.रेखा रामनाथ बर्वे | 10 |
| 4. महिला आणि राजकारण | प्रा. कु. सुनिता तु. राठोड | 12 |
| 5. सामाजिक कायदे व समाज कल्याण व परिवर्तनाचे एक साधन | प्रा. नवनाथ वेंकट बढे | 15 |
| 6. आधुनिकीकरणातील संयुक्त कुटुंबाचे अध्ययन | डॉ. संकेत सु. काळे | 20 |
| 7. किशोर संघर्ष ग्रस्त बालक एक अध्ययन | डॉ. रावसाहेब ठाकरे | 25 |
| 8. पर्यावरण मानसशास्त्राची ओळख | डॉ.रमाकांत गायकवाड | 30 |
| 9. समभावत्याच्या वर्तणुकीचे सैद्धांतीक दृष्टिकोन | प्रा. एन. एस. मेश्राम | 33 |
| 10. शास्त्रीय संगीत साधना व आधुनिक तंत्रज्ञान – .... | डॉ. विनोद व्ही. ठाकुरदेसाई | 36 |
| 11. सार्क: सत्काली, परिपूर्ती व आव्हाने | प्रा. रणदिवे टी. वाय. | 39 |
| 12. गोंड समाजाची लोककला आणि संगीत | प्रा. सचिन सुरेशराव बंडगर | 42 |
| 13. नाट्यसंगीताचे बदलते स्वरूप | चारुदत्त गोविंद आफळे | |
| | डॉ. अनया थत्ते | 46 |
| 14. उस्ताद डॉ. गुलाम रसूल (परभणी) .... | संजय विष्णू सांगवीकर | 51 |
| 15. सतपुड़ा के कोरकू जनजातिक प्रचलीत नृत्य प्रकार | डॉ.नारायणराव चोरे | 55 |
| 16. संविधानवाद : संकल्पना आणि तत्वे | प्रा. डॉ. राजु दनारसे, | |
| | डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | 57 |
| 17. स्वच्छ भारत मिशन: धोरणात्मक विश्लेषण | प्रा. श्रीकृष्णपरिहार | |
| | प्रा. प्रवीण चव्हाण | 61 |
| 18. महात्मा गांधीचे शैक्षणिक विचार | सौ.अनिता प्रमराज भोळे | 65 |
| 19. भारतीय प्रशासन: नागरी विकासाच्या दिशेने | डॉ. कदम डी.एम. | 67 |
| 20. क्रीडा वार्तांची प्रभावक्षमता : एक अभ्यास | प्रा. उमेश रामचंद्र साडेगावकर | 70 |
| 21. ग्रामीण विकासात मनरेगाचे योगदान –एक समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. दत्ता एम. तंगलवाड | 74 |
| 22. योगाची उत्पत्ती आणि ऐतिहासिक विकास | प्रा.डॉ.ए.डी.टेकाळे | 77 |
| 23. मुगलकालीन धार्मिक धोरण : एक अभ्यास | डॉ.संजय बाबुराव वाकळे | 79 |
| 24. महिला सक्षमीकरण आणि कृषीक्षेत्र | डॉ. अश्रु जाधव | 82 |
| 25. राजर्षी शाहू महाराजाचे 'स्त्री विषयक' कायद्यांचा सामाजिक अन्वयार्थ | प्रा. डॉ. सुरेश वि. दनवडे | 85 |
| 26. तकनीकी सुविधा और कृषि विस्तार | डॉ. विरगणे एम.एन. | 88 |
| 27. भारतीय संगीतातील परंपरा, नव्या संकल्पना व त्यांचा आस्वाद | डॉ. सुजाता व्यास | 90 |
| 28. भारतीय मतदारांचा बदलणारा दृष्टीकोन .... | प्रा. सुपेकर व्ही.पी. | 94 |
| 29. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि बुद्ध धम्म | प्रा. पाटील वंदना सांडूराव | 96 |
| 30. लोकसंगीत और मानव जीवन | डॉ. वनिता तु. भोपल (कैतकर) | 99 |
| 31. खुल्या कारागृहातील कैद्यांचा पुनर्वसनात्मक अभ्यास | प्रा. विनोद बी. खंडकर | 100 |
| 32. भारतीय संगीत पर विज्ञान का योगदान | प्रा.डॉ. चंद्रकिरण घाटे | 105 |
| 33. भारतीय संगीताच्या प्रचार–प्रसाराचे सशक्त माध्यम : वारकरी संगीत | प्रा. विजय राधाकृष्ण आळशी | 109 |
| 34. कोरकूओं के वाद्य एवं जानकारी | प्रा.विनोद दिगांबर वानखडे | 112 |
| 35. ई–प्रशासन व ई–शासन फरक | प्रा. दिनेश भारत निकते | 113 |
| 36. भारतीय तत्त्वज्ञानात योगाभ्यासाचे महत्व | प्रा. सौ. कुलकर्णी स्वाती ना. | 115 |
| 37. आजाद हिंद फौज मे डॉ.लक्ष्मी सहगल का योगदान | डॉ. विवेकानंद ल. चव्हाण | 117 |
| 38. लोकप्रशासन का परिचय | प्रा.डॉ. पी.पी. मुंढे | 120 |
| 39. महिला सशक्तिकरण : के परिप्रेक्ष्य मे महिलाओं की स्थिति | प्रा.डॉ.पुरुषोत्तम भ. मनगटे | 122 |
| 40. महिला सबलीकरणामध्ये शासनाच्या योजना व कायद्यांची भूमिका .... | सौ. घुगे जयश्री बापुराव | 125 |
| 41. महिलांच्या आरोग्याचा समाजशास्त्रीय अभ्यास | पंदिलवाड ए. एम | 127 |
| 42. पडीक जमिनीचा विकास व व्यवस्थापन एक भौगोलिक अभ्यास | प्रा. डॉ. घुगे एस. पी | 129 |
| | प्रा. पठाण के. एम | |


Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

23, 10:28 PM WhatsApp Image 2023-04-05 at 10.55.23 PM.jpeg



27

# भारतीय संगीतातील परंपरा, नव्या संकल्पना व त्यांचा आस्वाद

डॉ. सुजाता व्यास
सहयोगी प्राध्यापक संगीत
शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद
Mob: 9822474789

सारांश–

कोणतीही कला व त्याचे शास्त्र या विषयक पुर्नभ्यास, सखोल चिंतनाचा ध्यास लागला की त्याची मूळ पार्श्वभूमी जाणून घेण्याची उत्कंठा वाढीस लागते. संगीत कलेचेही बाबतीत असेच म्हणता येईल की संगीताचे मूळ तत्व स्वर,लय,भाषा यांनी निर्माण झालेल्या विविध शैली यांचे संभाव्य परिणाम हा पुर्नभ्यासाचा आधुनिक काळातील नव्या वळणाचा विषय आहे.

जागतिकीकरणाच्या या • तांत्रिक युगात संगीत कलेतील अनेकविधरुपावर विविधांगी परिणाम झालेला आढळतो. त्याचा संशोधन रुपाने निरीक्षण व मूल्यमापन करणे हा या लेखाभागातील हेतू आहे.

संगीत कलेचा 'साधना' या अर्थाने विचार केला तर त्यातील साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र, समाजशास्त्र इ. शास्त्रांचा संगीताशी कसा संबंध आहे व वर्तमान काळात कलाकार व रसिकश्रोत्यावर याचा अंतःसंबंध कसा दिसतो हा चिंतनाचा विषय आहे.

वर वर परिणामी 'मनोरंजन' वाटणा–या या कलेमागील 'साधना'या विषयीचा विचार थोडा बदल घेत घेत आज संपूर्ण बदलला की काय असे चिंतनानंतर अनुभवास येते. कलेला प्रसारीत करणा–या विविध माध्यमानी या कलेच्या आस्वादनाच्या कल्पनाच बदलून टाकलेल्या वाटतात. कोणत्याही कलेचा संक्रमण काळ हा निश्चित सांगता येत नाही. मात्र ४–५ दशकापासून या नविनतेचे पडसाद दिसू लागतात व अचानक त्याचे निश्चित रुप म्हणून कलेच्या नव्या प्रयोगाला नवे नाव किंवा त्याची अनुभुतीही नव्याने ओळख करुन देणारी. नव्या वाटेने जणू नवीन ज्ञानात भर टाकणारी भासते. पण त्यातील स्वर, लय, भाषा ही तत्वे कायम असतात.

आज नव्या रुपात नव्या तंत्रज्ञानाने मनोरंजानाच्या नवीन माध्यमातून अशी प्रस्तुती जेव्हा मार्गस्थ होते तिचे काही वेळेस स्वागत असते तर काही वेळेस ती भिन्न भिन्न मतभेदांच्या वातावरणात शंकाकुल तर कधी अस्थिर जाणवते. असे असले तरी या प्रयोगातून रसिक श्रोत्यांनी 'आनंदन' या गुणातून त्याचे आस्वादन सुरु केले असते.

वर्तमान हिंदुस्थानी संगीताच्या स्वरुपाचे आकलन होण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा संगीत कलेवर आढळणारा प्रभाव व परंपरागत संगीताची जोपासना पिढयानपिढया ज्या कला उपासकामुळे केली जाते त्याचा आजच्या तरुण पिढीवर होणारा परिणाम हा चिंतनाचा विषय आहे.

तंत्रयुगामुळे जागतिक संगीत हे नव्या पिढीच्या सहवासात अधिकाधिक असल्याचे जाणवते. "लय" प्रभावी हे संगीत युवापिढीला जोश व नवचेतना देणारे आहे असे दिसून येते. पण मूल भारतीय संगीतातील स्वर, लय, शब्द यातील 'माधुर्य' गुण आस्वादिल्यानंतर संगीत ऐकण्यातील फरक हा तरुणाना जाणवतो.

संगीताचे मूळ तत्व स्वर, लय, भाषा या आधारे संगीताचे प्रकार जनमानसात रुजले आहे. गेल्या दशकात या प्रकारांची ओळख डॉ. अशोक रानडे यानी त्यांच्या कार्यशाळेतून सर्व सामान्य श्रोत्याना, साधक व कलाकरांना करुन दिली आहे. या प्रकारामध्ये सामान्य कलाकारापासून मोठ मोठया कलाकारांचा वावर असला तरी डॉ. अशोक रानडे यांनी सखोल निरीक्षणातून या संगीत प्रकाराची पध्दत 'रीत' त्याचा जनमानसातील परिणाम या विषयी विचार अभ्यासपूर्ण रितीने मांडला आहे.

भारतीय संगीत असे म्हटले की शास्त्रीय संगीत व सुगम संगीत असाच विचार सर्वांच्या मनात येतो पणसंगीताच्या प्रत्येक प्रकाराचे निरीक्षण केले तर त्याचेही शास्त्र आहे असे अनुभवास येते. शास्त्रीय संगीतातील विविध शैली मांडण्याच्या विविध रिती 'बाणी', 'घराणी', 'बाज' या नावाने संबोधल्या गेल्या सुगम संगीतातर्गत येणारे गीत प्रकार ज्यामध्ये भावगीत, भक्तीगीत, सामुहीक गीत, गझल, चित्रपट गीत, यांचा समावेश होतो या सर्वच गीत प्रकारांचा 'सुगम' या संकल्पनेत मांडले असले तरी त्याच दिसणा–या तत्त्वाशिवाय त्यातील वेगळेपण ही त्या त्या गीत प्रकारांची विशेषता म्हणता येईल त्याना काही वेळेस शास्त्रीय रागाचे कोंदण असले तरी त्यातील 'भावदर्श' हे तत्व सांभाळले जाते.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

https://mail.google.com/mail/u/0/#inbox?projector=1

23, 10:28 PM WhatsApp Image 2023-04-05 at 10.56.05 PM.jpeg



नवविज्ञानाने या संगीत प्रकारात बदल होत जाणे क्रमप्राप्त आहे. विज्ञानाद्वारे संगीत कलेचा विकासात्मक प्रवास हा निरीक्षणाचा व चिंतनाचा समीक्षात्मक विषय होऊ शकतो. जागतिकीकरणाने संगीत कलेतील अनेकविध स्वरूपात परिणाम आलेला आढळतो.

जागतिक संगीत स्तरावर भारतीय संगीतातील 'माधुर्य' या गुणाचे कायम स्तुतीवर्णनच कलावंतांनी केलेले आहे. भारतीय संगीताचा आज साहित्यशास्त्र, सौंदर्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी शास्त्राशी कसा संबंध आहे त्यामुळे वरवर मनोरंजन वाटणा-या या कलेचा दूरगामी परिणाम आज कलाकार व रसिक श्रोत्यांना विविधतेने साधला जातो असेही जाणवतो. या संदर्भाने विविध प्रसार माध्यमे उपयुक्त विषयाच्या आधारे कला प्रस्तुतीचे नवनवीन उपक्रम, प्रयोग सादर करताना दिसतात.

संगीत कलेच्या साधनेचा विचार केला तर कला प्रस्तुतीत परंपरागत शैलीच्या आधारे साधना करणारा नवीन संकल्पना किंवा प्रयोग हा रसिक व सर्वसामान्य श्रोत्यासाठी सादर करणारा 'कलाकार' वर्ग समाजाला परिवर्तनशील ठेवणारा असा एक वर्ग आहे. आणि परंपरा जतन करण्याच्या हेतूने शास्त्रीय संगीताची साधना करणारा दुसरा वर्ग समाजात आहे. निरंतर संगीत कलेची साधना करीत परंपरेने जपलेल्या गायकीची मूल्ये पुढील पिढीला सोपविण्याचा या कलाकारांचा परंपरावादी विचार असणारा वर्ग आहे. त्याच बरोबर समाजातील सर्व सामान्य रसिकांना संगीताकडे आकर्षित करणे, परिणामी संगीत कलेच्या आस्वादाना बरोबर त्यातील नवतत्वामागील मेहनत, जिद्द इत्यादीची जाणीव करून देणारे नवेनवे प्रयोग सादर करणे हे या संगीतातील नवविचार वर्गाचे कार्य सुरु आहे.

या दोन्ही विचारांचा मागोवा घेतला तर वर्षानुवर्षे समाजात उच्च प्रतीचे शास्त्रीय संगीताचे कलाकार व सर्वसामान्य श्रोता ज्याला हौशी गायक म्हणता येईल असा वर्ग असतो. केवळ शास्त्रीय संगीताचाच विचार केला तर 'रंजन' या मुळ हेतूने राग गायनात 'रंजकत्व' असले पाहिजे, अशीच शिकवण शिष्याला गुरुकडून दिली जात असे.

मध्य कालात शास्त्रीय संगीताची प्रस्तुती राजदरबार, संस्थाने व देवालयातून होत असे. धृपदधमार, ख्याल, ठुमरी या शैलीचा उगम, भरभराट याच ठिकाणी झाली या शैलीच्या विकासात हीच ठिकाणे त्याचे आधारस्तंभ होते तर समाजात जनजीवनाशी जोडलेले लोकगीत हे सर्व सामान्यामध्ये प्रचारात होते. 'धृवा' प्रबंधातून उदयास आलेली धृपद शैली पुढे चार 'बानी' मध्ये विकसित झाली असे म्हटले जाते की कोणतीही कला ही समाजाच्या कालोघात प्रवाहित होत होत विकसित होते.कलेचे हे संक्रमण 'बदल' वे नवे रूप धारण करते काळानुसार त्याचे अवलोकन केले तर धृव प्रबंधातून 'धृपद' ही शैली जन्माला आली. मध्यकाळातील लिखा भरभराट म्हणजे या शैलीच्या निर्माण झालेल्या 'बानी' होय. या शैलीच्या प्रचारात असतानाच ख्याल ही शैली उदयास आली व धृपद शैलीच्या चार 'बानीचे' विशेष गुणांचा अंगीकार करीत ख्याल संकल्पनेचे अस्तित्व निर्माणझाले व 'बानी' चे रूपांतर ख्यालाच्या 'घराणी' या नावाने प्रचारात राहिले. स्वर, लय, भाषा या संगीताच्या मूळ तत्वावर जेव्हा एखाद्या नवीन शैलीची निर्मिती होते तेव्हा त्याचे नवेपणे हे प्रायोगिक संकल्पनेचे असते. त्या संकल्पनेला एक निश्चित प्रारुप आले व रसिकांकडून त्या गायनाला योग्य प्रतिसाद मिळाला की त्या शैलीचा जन्म साकार झाला असे सिध्द होते. शास्त्राभ्यास व त्याचे निरीक्षण करून पूर्णभ्यासाने असे लक्षात येते की प्रबंध प्रकारातून निर्माण झालेल्या नव्या शैलीचे नवे रूप म्हणजे मध्यकाळात (मोगलकाल)उदयास आलेल्या धृपद, ख्याल, ठुमरी, तराना या शैली होत. धृपदानंतर ख्यालशैली ही विशेष प्रचारात राहिली.

एक शतकाचा अवधी हा ख्यालाच्या घराण्यांनी व्यापलेला होता. घराण्याचे अवडंबर कमी कमी होत पुढे प्रत्येक घराण्यातील चांगल्या विशेषता उचलण्याची व गायकी प्रगल्भ करण्याची कलावंतांमधील ओढ ही स्वतंत्र प्रतिभेला विकसित करणारी ठरली. २५–३० वर्षाचा हा कालावधी शास्त्रीय संगीतासाठी संक्रमणकाल होता असे म्हणावे लागेल. कारण शास्त्रीय संगीताची घरंदाज जोपासना या वर्गाकडून झालेली असली कोणत्या घराण्याच्या गायकीची रीत त्याच्या प्रस्तुतीत तसे याच सुमारास आकाशवाणी, रेडिओ व चित्रपट संगीत ही संगीत कलेच्या आस्वादनातील नवे घटक विकसीत झाले. तेव्हाच आधुनिक विज्ञान काळाचा प्रारंभ आला असे अभ्यासाअंती जाणवू लागले. मैफीलीच्या फापटपसारा कमी होऊन आकाशवाणीवर गायकांना वादकांना अर्ध्या तासाचे शास्त्रीय गायन करण्याचा सराव करावा लागला परंपरेतील षड्ज स्वराचा लगाव, राग स्थापित करणे वगैरे संकल्पना शिथिल झाल्या. ध्वनिक्षेपकाने आवाजाची मेहनत घेणे इत्यादरही मर्यादा आल्या.पुढे टिव्ही, टेपरेकॉर्डर, सिडीया प्रसार माध्यमामुळे घराण्याची गायकी शिस्तबद्ध चाकोरीत राहणे अशक्य झाले.

कलावंतांबरोबरच श्रोताही निर्माण होणे गरजेचे या कल्पनेने संगीत विद्यालय, विद्यापीठे निर्माण होऊन घराण्याच्या रितीचा आधार विस्कळीतझाला.



776

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

चित्रपट संगीतात उपशास्त्रीय संगीतातील ठुमरी, गजल ह्याचे रुप प्रथम साकार होऊ लागले. वेळेच्या मर्यादेमुळेगायनातील कस व चित्रपटाचे भावप्रदर्शन योग्य व्हावे यातून गायन वादन यांची एक कलाकृती ही चित्रपटगीत म्हणून रेखाटली गेली. या गीताचे रेडिओ, टिव्ही या प्रसारमाध्यमांनी केलेले प्रभावी प्रसारण असे की नव्याने प्रदर्शित झालेल्या चित्रपटातील गीते एकाच कुटुंबातील सर्व सदस्य अगदी बालक तरुण ते आबालवृध्दाच्या तोंडी असे. यातून होणारे आस्वादन हे कधी काव्याथ्र्याने भावणारे तर कधी त्या गीताच्या स्वरावलीने आकर्षित करीत असे व घरोघरी शास्त्रीय संगीत रेडीओवर ऐकण्यापेक्षा सुगम, चित्रपट गीते सहज ऐकली जात. रेडिओ, टिव्ही, चित्रपट या प्रसार माध्यमांनी संगीत विविध रुपाने जनमानसात पोहचले खरे काय ऐकावे याचीही आवडनिवड समाजमनात होऊ लागली. कारण एक काळ शास्त्रीय संगीताचा असा होता की शास्त्रीय संगीताची प्रस्तुती व रंजन हे राजदरबार, संस्थानातच सीमित होते. ठुमरी या शैलीने शास्त्रीय संगीताचा दर्जा ढासळला होता या स्थितीत परंपरागत गायकव समाजातील खरा रसिक श्रोता ह्यानी उचललेली क्रांतीकारी पावले ही फार महत्वाची ठरली. याच क्रांती विचाराने चांगले संगीत श्रवण करण्याचा अभिनव विचार घेऊन संगीत कलेची जागर जनमानसात बिंबवणारा कलावंत व श्रोतावर्ग विशेषत्वाने झटला. ह्यात अनेक कलावंत मंडळींचा नामोल्लेख करता येईल हिराबाई बडोदेकर, सरस्वती राणे, माणिक वर्मा या स्त्री वर्गाचे विशेष योगदान ठरले आहे.

शास्त्रीय संगीतातील ख्यालाची घराणी संपूर्णपणे संपली असेही आज म्हणता येत नाही. मात्र घराण्याची प्रतिज्ञा शिथिल झाली असे म्हणता येईल. आज केवळ घराण्याच्या शिस्तीत रागगायनात ख्यालगायन करणारा वर्ग ठुमरी ही तयारीने गातांना दिसतो. गेल्या १५ – २०वर्षात कलावंत हा चतुरस्त्र गायक असावा ही संकल्पना नव्याने समोर आली. मग आपली संगीत साधना सादर करण्यासाठी प्रथम रागगायन ख्याल नंतर ठुमरी, भजन, अभंग गाण्याचीच पध्दत सुरु झाली शास्त्रीय संगीताला योग्य दर्जा मिळावा म्हणून महाराष्ट्राने सुरु केलेली संगीत नाटकाची प्रथा ही त्याकाळातील प्रायोगिक संकल्पना समाजाने उचलून धरली ह्या संगीत नाटकातून शास्त्रीय संगीतातील रागदारीत येणा–या सर्व शैलीचा समावेश प्रथम होता त्यातच पुढे मराठी लोकगीत परंपरेचाही शिरकाव झाला शास्त्रीय व लोकगीत ह्याचा उत्तम संगम या संगीत नाटकातून श्रोत्यासामोर ठेवणे या विचारातून कलेच्या विकासाच्या कक्षा रुंदावल्या. आज शास्त्रीय परंपरा जतन करणे आणि नवी संकल्पना मांडणे या नव्या तंत्रज्ञानाने कलेचे क्षितिज विस्तारित होत चालले आहे.

घराण्याच्या शिस्तीचे पालन करणा–या स्वरमयी डॉ. प्रभा अत्रे यांनी ख्यालाबरोबरच दादरा, ठुमरी, भावगीते, गजल, संगीत समारोहातून गाण्याची नवी वाट सुरु केली. ह्या आधी ख्यालगायन, तराना, ठुमरी नाट्यगीत हे रागदरी अंतर्गत मांडले जाई. गेल्या काही वर्षात असेही निरीक्षणाने लक्षात येते की मान्यवर कलावंत मंडळींनी संतवाणीला राग गायनाच्या आधाराने संगीतबध्द केले.काही मान्यवर गायक – वादकांनी चित्रपट संगीताचे नियोजन केले व घराण्याच्या शिस्ती बरोबर नव्या संकल्पनाचा अंगीकार केला. ही परिवर्तनशीलता समाजाची गरज असे म्हणता येईल. जयपूर – अत्रोली घराण्याच्या सर्वसर्वागानसरस्वती किशोरी आमोणकरांनी रागगायन व त्यानंतर संतमहिमा स्वरबध्द करुन प्रभावीपणे लोकांसमोर मांडला. पण त्याहीपुढे 'गजल' या काव्याची रचना व स्वरबध्दता करुन परिवर्तनाची नवी संकल्पना जाणली असे म्हणता येईल. परंपरेचे जतन करीत लोकाभिमुख नव्या संकल्पना मांडणे हे आता कलाकाराच्या प्रतिभेचे नवं रुप आहे. अद्याप त्याचे कोणतेही नामकरण झालेले नाही. पाश्चात्य प्रभावातील लय या तत्वाला प्राधान्य देत रिमिक्स व फ्युजन हे संगीत सर्व मान्यवर कलाकारांनी स्विकारले आहे.

दूरदर्शनवरील 'स्पर्धा' मनोरंजनातून आज कलावंत निर्मितीचा नवा विचार गेल्या आठ दहा वर्षातील नवा पायंडा सुरु झाला आहे. नक्कल या एकाच अंगाने प्रोत्साहन देत त्या कलाकाराला मोठे करायचे हे सर्व प्रगत तंत्रज्ञानानेच शक्य झाले आहे असे म्हणता येईल. या स्पर्धातून कलावंत निर्मितीची संकल्पना बदलत गेली असे जाणवते. केवळ गीताचे अनुकरण या कलावंताकडून बहुतांशी केले जाते. काही कलावंतांची स्वप्रतिभा व साधना जाणवते तर काही कलावंत स्वर, ताल, लयीची साधना माहिती नसल्याचेही सांगतात. मी गायनाची रीत अभ्यासलेली नाही. केवळ श्रवणातून गायन अभ्यास केला असे कबुल करतात.

निष्कर्ष : वरील दोन्ही विचाराचा विश्लेषणात्मक विचार शोधलेखातून मांडतांना असे स्पष्ट होते की शास्त्रीय ते सुगम संगीतातील कोणताही संकल्पना ही आस्वादानासाठी तंत्रज्ञानाने अधिकच विस्तारित केली आहे.

- परंपरा जतन करायची या विचारातून महाविद्यालयीन संगीत शिक्षण पध्दतीने रागाचे आरोहअवरोहात्मक आलापी व अलंकार घोटून



Govt. College of Arts & Science Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

…com/mail/u/0/#inbox?projector=1

तयार केलेल्या तानानी जी रागदारीची ओळख होत असली तर श्रवण अभ्यासातून शास्त्रीय संगीतातील रागाची विस्तृतता,सखोलता समजून घेता येईल.

- अगदी गेल्या शतकातीलमहान कलावंताच्या गायनाची उपलब्धी नवीन तंत्रज्ञानाने शास्त्रीय अभ्यासकांपर्यंत पोहोचवली आहे. रागाच्या मंदिरातील सौंदर्यस्थळे टिपण्याइतका नवा तरुण कलाकार चोखंदळ व रसास्वादी झाला आहे.
- प्रसिध्दीच्या झोतात रहावे यासाठी संगीतातील सर्व गीतप्रकार गाते असला तरी या 'खणखणीत सोन्याचा कस त्याला साधनेला प्रेरित करतो असे तरुण परंपरावादी विचाराचे कलावंताचे मत आहे.
- नव्या तंत्रज्ञानाने भारावलेले, संगीताच्या रियाजातील जाणीव नसलेले काही नव युवक प्रसारमाध्यमांच्या विविध वाहिनीवर स्वतःला प्रदर्शित करण्यासाठी चकारा मारीत बसलेले आढळतात. या स्टेजवरून नवनवीन प्रयोगाच्या संधी मिळतात म्हणून प्रसारवाहिनीवर खेपा करण्यात अस्सल रियाजी संगीत यातील वेळ व अभ्यासावर लक्ष केंद्रीतच करु शकत नाही. झटपट प्रसिध्दी व व्यावसायिक यशाच्या संधी मिळविण्यात वर्तमान तरुण स्वतःला ओळखण्यात यशस्वी होतोच असे नाही.
- चित्रपट संगीत हे रोज नव नवे रुप धारण करीत श्रोत्यांना व तरुणांना आकर्षित करते व ती गीते जशीच्या तशी म्हणण्यात आपले गायक सिध्द करणे हीच संगीत कलेची सेवा व समाजाला आस्वादानाचे खरे रुप वाटते.
- २५–३० वर्षापूर्वीच्या चित्रपट गीताची अवीट गोडी ही आस्वादक होती. त्यातील भारतीय वाद्याचा प्रयोगाची भावपूर्ण स्वरसंगतीही गीताइतकीच मनाला भावून जाणारी होती. तिच गीते पाश्चात्य वाद्यासह तितकी प्रभावी ठरतनसली तरी त्यावाद्यासोबत गाऊन ऐकण्याचा आस्वादनाचा 'आनंद' आज घेतो आहे.
- आस्वाद, रसपरिपाक रसिकाला त्यातून 'तृप्ती', समाधान या संगीत कलेच्या प्रस्तुती नंतरच्या स्थितीला कायमच महत्वाचे मानले आहे. समाज आणि संगीत ही समाजशास्त्राची बैठक अर्थात कलाकार आणि श्रोते अशी परस्पराशिवाय होणे शक्य नाही यातील महत्वाचा मुद्दा साधना आणि अविष्कार जसा महत्वाचा आहे तसाच तो सादरीकरण, ग्रहण, व आस्वादन अर्थात् 'आनंदन'या श्रेणीचा म्हणून महत्वाचा आहे.

सर्जनशीलता या मानसिक शक्तीचे अस्तित्व शास्त्रीय, उपशास्त्रीय व सुगम संगीतावर समान स्वरुपात महत्वाचे आहे यातील नव नव्या संकल्पनावर रसिकाच्या आस्वादाचा प्रतिसाद मिळत राहणार. नव्याचे स्वागत व अंगीकार त्यासाठी परंपरेचा वारसा टिकविणारे हे कलावंत असाच आस्वादनाचा प्रवास निरंतर करणार यात दुमत नाही.

संदर्भ ग्रंथ :


1. मुक्त संगीत संवाद – डॉ. श्रीरंग संगोराम
2. संगीत विचार – डॉ. अशोक रानडे
3. आस्वादक संगीतसमीक्षा– डॉ. श्रीरंग संगोराम
4. घुंगरू पाऊगते दोन तंबोरे – पं. बबनराव हळदणकर
5. भारतीय संगीत विज्ञानशास्त्र –डॉ. सुधेला दिक्षित


०००

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad



277